वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शांतीनगर, पोलीस स्टे. भिवंडी

IO कॉपी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** शांती नगर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0107 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/02/2022 02:52 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 16/02/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/02/2022

**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/02/2022 **Time (वेळ):** 01:26 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/02/2022 01:26 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** उपविभागीय अधिकारी तथा,उपविभागीय दंडाधिकारी, भिवंडी विभाग,भिवंडी कार्यालय, ठाणे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री पंढरीनाथ बुधाजी जाधव

**(b) Guardian's Name (पालक चे नाव) :** बुधाजी जाधव

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1959 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, युआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मु साने, ,पो वासींद,ता शहापुर, जि ठाणे,वाशिंद पोलीस स्टेशन,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मु साने, ,पो वासींद,ता शहापुर, जि ठाणे,वाशिंद पोलीस स्टेशन,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9130883142

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विठ्ठल रामभाऊ गोसावी | | वडील का नाम : रामभाऊ गोसावी | 1. 134/1,रूम नं 401, ए विंग,,ओम साई होम बिल्डींग, टैमघर,,साईबाबा मंदिराचे जवळ, भिवंडी,बायपास रोड, भिवंडी,,शांती नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | विजय कमलाकर भोईर | | वडील का नाम : कमलाकर भोईर | 1. मु भरोडी,, पो अंजुर,, ता भिवंडी,, जि ठाणे,शांती नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | लक्ष्मण सिंह शंकर सिंह राजपुरोहित | | पत्नी का नाम : शंकर सिंह राजपुरोहित | 1. 504,ग्रीन पार्क, ब्लाक नं 101,ए विंग, पहिला मजला,,कोंबड पाडा, अजयनगर ,भिवंडी,निजामपूरा,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रॉनिक सामान | रेकॉर्ड प्लेअर | सनडिस्क कंपनीचे 08 जी.बी. क्षमतेचे मायक्रो एस.डी. कार्ड क्र. 6095DTD250ER | 0.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | धनादेश | लाच म्हणून वापरलेला स्टेट बँक ऑफ इंडीया या कंपनीचा चेक | 400,000.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | धनादेश | विविध बँकेचे एकूण 05 चेक | 3,765,000.00 |
| 4 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | धनादेश | विविध बँकेचे एकूण 06 चेक | 2,425,600.00 |
| 5 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | धनादेश | विविध बँकेचे एकूण 32 चेक | 17,282,500.00 |
| 6 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम | 200,000.00 |
| 7 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 20,200.00 |
| 8 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 353,000.00 |
| 9 | इतर | कपडे/विविध | पिवळ्या रंगाचा हाफ बाह्याचा शर्ट | 0.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 24,446,300.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

नमुद गुन्ह्याची थोडक्यात हकीकत अशी आहे की,यातील नमुद ता.वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक श्री विठ्ठल गोसावी यांनी फिर्यादीकडे त्यांची भूसंपादन केलेल्या शेतीचा 55,00000 रु.मोबदला फिर्यादिला देण्यासाठी आरोपी एजंट विजय भोईर यांच्या मार्फतीने 800000रक्कमेच्या लाचेची मागणी करून तोडजोडांती आरोपी लोकसेवक विठ्ठल भोईर यांनी 600000 लाचेची मागणी केली व आरोपी इसम श्री लक्ष्मण राजपुरोहित यांनी दोन लाख रूपये रोख व चार लाख रु बँकचे अशा स्वरूपात लाच ही आरोपी लोकसेवक विठ्ठल गोसावी यांच्या सांगण्यावरून स्विकारली व त्यानंतर त्यास आलोसे श्री.विठ्ठल गोसावी यांनी सहमती दर्शवली अशा फिर्यादीच्या जबाबावरुन प्र.प्र.अधि. 1988कलम 7,7(अ),12अन्वये गुन्हा नोंद.(नमुद गुन्ह्याची प्रथम खबर ही स्वतंत्र जोडलेल्या पानावर टंकलिखित करण्यात आली आहे (प्रथम खबर नजकूर 8000अक्षरे असल्याने )

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) **or** (किंवा)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): SAmel B. Shinde....

**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.) प्रत मिळाली P.B. [signature]

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14.**Signature/Thumb Impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

A. B. [signature]

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature]

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SHITAL VILASHROV RAUT

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(क्र.):

ठाणे अंमलदार
शांतीनगर, पो. ठाणे भिवंडी



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner

फिर्याद दिनांक २४/०२/२०२२

श्री पंढरीनाथ बुधाजी जाधव, वय ६३ वर्षे, धंदा– महालक्ष्मी टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स व शेतकरी रा.ठि.– सरकारी दवाखान्याजवळ, मु.साने, पो. वासिंद, ता. शहापुर, जि. ठाणे. मो.क्र. ९१३०८८३१४२

---

मी समक्ष फिर्याद देतो की, मी वर नमुद पत्त्यावर माझे जन्मापासुन माझे संपुर्ण कुटुंबासह रहात आहे. मी मु. साने पो.वासिंद, ता.शहापुर येथे शेती करीत असुन महालक्ष्मी नावाने टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सचा जोड–व्यवसाय करतो. त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्न व शेती करून मिळणारे उत्पनावर माझा उदर निर्वाह करतो.

माझी मु. साने, पो.वासींद, ता शहापुर जि. ठाणे येथे ४ एकर वडिलोपार्जीत जमीन आहे. मौजे सा ने येथील सर्वे न. १२८ मधील कल्याण–कसारा ३ रा रेल्वे मार्गामध्ये एकूण ३७.७६ गुंठे माझी जमिन शासनाने संपादित केली आहे. सदर जमीनीची नुकसान भरपाई म्हणुन रु. ५५,००,०००/– रक्कम मला शासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग या कार्यालयाकडुन मिळणार आहेत. त्याबाबत संबधित सर्व कागदपत्रे ही माझे परिचयाचे मित्र श्री बापु पाटील यांच्या मार्फतीने दि.२५/०१/२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, ता. भिवंडी यांचे कार्यालयास सादर केली होती. त्याचा मोबदला अदयापपावेतो मला देण्यात आलेला नसुन माझे काम त्या कार्यालयाने प्रलंबित ठेवले आहे.

माझा महालक्ष्मी टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय असल्याने व मला सतत बाहेर जावे लागत असल्याने माझे परिचयाचे मित्र श्री बापु यशवंत पाटील, राहणार– शहापुर यांना माझे शासनाने भुसंपादन केलेली मोबदल्याचे कायदेशीर काम प्रलंबित असल्याने वरिल जमीनीचे सर्व कामकाज पाहण्यासाठी उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, ता. भिवंडी यांचे कार्यालयास सादर केलेल्या कागदपत्राचा पाठपुरावा करण्यासाठी माझे सहीनिशी दिनांक २४/१२/२०२१ रोजी लेखी संमती दिली होती व त्यानुसार श्री बापु पाटील हे माझे वर नमुद काम बघत होते.

माझे भुसंपादन केलेल्या जमीनीच्या मोबदला कधी मिळणार याबाबत मी माझे मित्र श्री बापु पाटील यांचेकडे दि.०५/०२/२०२२ रोजी विचारणा केली असता, त्यानी मला सांगितले की, त्यांनी दि. ०४/०२/२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, ता. भिवंडी या कार्यालयातील श्री विठठल गोसावी (नायब तहसिलदार, ता. भिवंडी) यांची भेट घेतली असता, त्यांनी माझे जमीनीचे भुसंपादन कामासाठी रु. ९,००,०००/– रक्कम दयावी लागतील असे श्री. विठ्ठल गोसावी यांनी त्यांना सांगितलेबाबत मला सांगितले. सदरच्या रक्कमेपैकी काही रक्कम ही श्री बाळासाहेब वाकचौरे (प्रांत मा.उपविभागीय अधिकारी, ता. भिवंडी), श्री नितीन जाधव (अव्वल कारकुन) यांना दयावी लागणार असल्याचे मला श्री बापु पाटील यांनी सांगितले. तसेच श्री विठ्ठल गोसावी (नायब तहसिलदार, ता. भिवंडी) यांनी सांगितले आहे की, सदरचे रु.९,००,०००/– रक्कम ही त्यांचे कार्यालयातीन मध्यस्थी खाजगी एजंट विजय भोईर उर्फ पिंटया यांच्याकडे दयावी लागणार आहे. सदरची लाच रक्कम रु.९,००,०००/– दिल्यानंतर भुसंपादन लाभार्थी शेतकरी म्हणुन कागदपत्र तयार करून त्याबाबत मोबदला देणार असल्याचे श्री विठठल गोसावी यांनी सागितले असे श्री बापु पाटील यांनी मला सांगितले.

माझी श्री. बाळासाहेब वाकचौरे (प्रांत, उपविभागीय अधिकारी, भिवंडी), श्री विठठल गोसावी (नायब तहसिलदार, ता. भिवंडी), श्री नितीन जाधव (अव्वल कारकुन) व मध्यस्थी एजंट विजय भोईर उर्फ पिंटया यांना लाच रक्कम रु.९,००,०००/– देण्याची ईच्छा नसल्याने माझे मित्र श्री बापु पाटील यांनी माझे वतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महासंचालक यांचेकडे ईमेलव्दारे दिनांक ०८/०२/२०२२ रोजी तक्रार देण्यास सांगुन सदरची कारवाई ही मुंबई लाप्रवि कार्यालयाकडुन सापळा कारवाई व तपास करण्याबाबत तक्रारीमध्ये नमुद केले आहे.

Scanned with CamScanner

माझे मित्र बापु पाटील यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालक यांचेकडे ईमेलव्दारे दिनांक ०८/०२/२०२२ रोजी केलेल्या तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई युनिटचे पो.नि. अमोल शिंदे, सपोआ नितीन जाधव यांनी मला व माझे मित्र श्री बापु पाटील यांना लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभाग, वरळी, मुंबई कार्यालयास दि. १६/०२/२०२२ रोजी बोलविले व माझेकडे मेलतक्रारीच्या च्या अनुषंगाने तक्रारीसंबधीत चौकशी केली त्यावेळी मी तक्रार लिहीत असताना माझे हात थरथरत असल्याने माझे वर नमुद प्रमाणे माझे सांगणेप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्याची प्रिंट काढली.

माझ्या तक्रारीवर पुढील कायदेशीर कारवाई करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन पो.नि. अमोल शिंदे व स.पो.आ. नितीन जाधव यांना नेमण्यात आले आहे त्यावरून त्यांनी थोडया वेळाने दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. पो.नि. शिंदे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून माझा संगणकावर टंकलिखीत केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. शिंदे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी वाचुन स्वाक्षरी करून पो.नि.शिंदे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज त्यांचे स्वत:चे ताब्यात ठेवला. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी माझ्या तक्रारीची आज दि. १६/०२/२०२२ रोजी शासकीय पंचांसमक्ष उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, ता. भिवंडी येथील श्री विठठल गोसावी (नायब तहसिलदार, ता. भिवंडी) यांचे कार्यालयात जावुन प्रत्यक्ष भेट घेवून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टच्या आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून, त्यामध्ये होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. शिंदे यांनी माझी पडताळणी पथकाशी ओळख करून देवुन मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, यांची मुंबई लाप्रवि विभागाच्या कार्यक्षेत्राबाहेर जावुन पडताळणी/सापळा कारवाई करण्याची लेखी परवानगी घेतली असल्याचे सागुन पो.नि. शिंदे यांनी स्वत:चे, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालयातून शासकिय वाहनाने पडताळणी पथकासह निघून भिवंडी एस.टी. डेपो, भिवंडी येथे थांबलो. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला, उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, ता. भिवंडी येथील कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टचे आतील बाजुस लावून शासकीय पंच श्री. नारायण रायपुरे व माझे मित्र श्री बापु पाटील यांचेसह पडताळणीकरीता पाठविले असता, मी, उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, ता. भिवंडी कार्यालयात जावून श्री. विठ्ठल गोसावी, नायब तहसीलदार यांची पंचासमक्ष भेट घेतली. त्यावेळी मी व मित्र श्री बापु पाटील यांनी श्री. विठठल गोसावी यांचेसोबत माझे जमीनीचे भुसंपादन केलेल्या जमिनीच्या नुकसान भरपाईबाबत चर्चा केली त्यावेळी श्री. विठठल गोसावी यांनी **''तुम्ही जा बाहेर चर्चा करा हया माणसाबरोबर, पिंटयाबरोबर...'** असे सांगुन तेथे उपस्थित असलेली एक व्यक्ती मध्यस्थी याची समक्ष भेट घालुन त्याचेशी बोला असे सांगितले. त्यानंतर मी, मित्र श्री बापु पाटील व पंच असे श्री गोसावी यांच्या कार्यालयाच्या बाहेर येवुन मध्यस्थी श्री भोईर याच्याशी चर्चा केली असता, श्री भोईर उर्फ पिंटया यांनी सांगितले की, **'' गोसावी साहेबांनी जे आठ लाख रू सांगितले आहेत ते तात्काळ आणुन दया. सदरच्या आठ लाखामध्ये प्रांत वाकचौरे साहेब, गोसावी साहेब व संपुर्ण स्टाफ आहे. सदरचे आठ लाख रू मिळाल्यानंतरच तुमचे काम होईल''** असे आणि त्यापेक्षा जास्त संभाषण पंचासमक्ष करुन माझ्याकडे रूपये ८,००,०००/–लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यानंतर मी, मित्र श्री बापु पाटील व पंच श्री. रायपुरे असे कार्यालयाच्या बाहेर निघुन ठरल्याप्रमाणे शासकीय वाहनाजवळ परत आलो. पो.नि. शिंदे यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून, डिजीटल व्हॉईसरेकॉर्डर मधील ध्वनिमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये लोकसेवक श्री. विठठल गोसावी यांनी पडताळणी दरम्यान मध्यस्थी यांस भेटुन बोला असे सांगुन मध्यस्थी श्री भोईर यांनी सांगितले की, गोसावी साहेबानी जे आठ रुपये सांगितले ते तात्काळ आणुन दया, असे संभाषण करुन लाचेची रक्कम लगेचच घेवून येण्यास सांगितले.

P. B. Jadhav

24/02/2022



Scanned with CamScanner

सदर बाबत दि. १६/०२/२०२२ रोजीच्या पडताळणी मध्ये लोकसेवक श्री विठठल गोसावी यांचेकडुन परिपुर्ण लाचेची मागणी साठी पुन्हा पडताळणी करणेकामी दि. १८/०२/२०२२ रोजी पडताळणी करण्याबाबत सपोआ नितीन जाधव, पो.नि. शिंदे यांनी सांगितले. त्यावरुन पुन्हा दि. १८/०२/२०२२ रोजी आम्ही ला.प्र.वि. मुंबई कार्यालयातून शासकिय वाहनाने पथकासह निघून भिवंडी एस.टी. डेपो येथे थांबलो. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी डिजीटल व्हॉईसरेकॉर्डर चालू करून त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला, उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, ता. भिवंडी येथील कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टचे आतील बाजुस लावून पंच श्री. नारायण रायपुरे व मित्र श्री बापु पाटील यांचेसह पाठविले असता, मी, उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, ता. भिवंडी कार्यालयात जावून श्री. विठठल गोसावी यांची भेट घेतली. त्यावेळी मी व मित्र श्री बापु पाटील यांनी श्री. विठठल गोसावी यांचेसोबत माझे जमीनीचे नुकसान भरपाईबाबत चर्चा केली त्यावेळी श्री. विठठल गोसावी यांनी म्हटले की,." **तुम्ही ह्यायना त्या माणसाला सांगता... सहामंधी कर... तो बोलतो की साहेब तुम्ही तयार करा त्यांनी... तुम्ही त्यांना काय बोले... साहेब सातला तयार झाले म्हणून... तो म्हणतो मला तुम्ही सातला का तयार झाले..." "तुम्ही पैसे आणले का आता...", " आहेत का पैसे आता तुमच्याकडे...", " मग घेवून या ना... आणि तुमच्या त्या वकिलाकडे जावून कामाला लागल ते करून घ्या...", " पूर्ण असलं तर दया.. ..", " थोडी कॅश असलं तर..", " तीन लाखाचा चेक घेवून या..", "तुम्ही बोलले.. सगळे पैसे देणार आहे आता.", " ठिक आहे करून घेतो...", "देणार कधी आहे... किती वेळ लागल", "तुम्हाला सांगितलयं ते करा तुमच्या मनाचं राज्य आपली गाडी घेवून जा... गाडीत बसवून दयाचं आणि तुम्ही दोघं गाडीत बसा आणि आणि गाडीत देवून टाका... पैसे कुठ पैसे कुठ आहेत तुमचे"** अशा प्रकारे वेगवेगळे प्रकारचे संभाषण त्यांनी केले. त्यानंतर लोकसेवक श्री गोसावी यांनी त्यांच्या परिचयाचा सोनार श्री लक्ष्मण शेठ यांस त्यांच्या स्वत:च्या मोबाईलव्दारे फोन कॉल करुन "माझेकडील सोने गहाण ठेवुन मला तीन लाख रोख रक्कम व तीन लाखाचा चेक लक्ष्मण शेठ या सोनारास देण्याबाबत सांगितले." त्यानंतर मी, मित्र श्री बापु पाटील व पंच श्री. रायपुरे असे कार्यालयाच्या बाहेर निघुन ठरल्याप्रमाणे शासकीय वाहनाजवळ परत आलो. पो.नि. शिंदे यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला व झालेल्या संभाषणाची हकीकत विचारुन, डिजीटल व्हॉईसरेकॉर्डर मधील ध्वनिमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले असता, लोकसेवक श्री विठठल गोसावी यांनी आठ लाख रू. च्या तडजोडीअंती रु. ६,००,०००/– रक्कमेची स्पष्ट मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लोकसेवक श्री गोसावी यांनी सदर लाचेची रक्कम आणि चेक ही सोनार श्री लक्ष्मण शेठ यांचेकडे माझे मालकीचे सोने गहाण ठेवुन देण्यास सांगितले होते. त्यानुसार श्री. विठ्ठल गोसावी, नायब तहसिलदार व खाजगी इसम श्री. विजय भोईर उर्फ पिंटया यांचेकडे करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये त्यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले तसेच श्री. विठ्ठल गोसावी, नायब तहसिलदार यांनी मला त्याचे परिचयाचे सोनार श्री. लक्ष्मण शेठ, शारदा ज्वेलर्स यांची भेट घेण्यास सांगितले.

पोनि शिंदे यांनी दि. २२/०२/२०२२ रोजी सोनार श्री. लक्ष्मण शेठ यांचेकडे पडताळणी कारवाईचे आयोजन केले व त्यानुसार दि. २२/०२/२०२२ रोजी पंचासह सोनार श्री. लक्ष्मण शेठ यांचे शारदा ज्वेलर्स, पार नाका, भिवंडी येथील दुकानात मी व माझा मित्र पाटील असे शासकीय पंच नारायण रायपुरे यांचेसह पडताळणी करणेकरीता गेलो असता, सोनार लक्ष्मण शेठ मला म्हणाले की, **"ते गोसावी साहेब बोलेले पैशाचे बघा आणि फोन करा, तुमचे सहा लाख रू करा आणि ताबा करा"** त्यानंतर मी सोनार लक्ष्मण शेठ यांना बोललो की, " **तीन लाख कॅश आणि तीन लाख चा चेक आणतो"** त्यावर सोनार लक्ष्मण शेठ मला बोलले की, **"हा..हा.. चालेल"** त्यानंतर मी, मित्र श्री. बापु पाटील व पंच असे त्या ठिकाणाहून निघून बाहेर येवून शासकीय वाहनाजवळ आलो. त्यावेळी पोनि शिंदे यांनी माझे शर्टच्या आतील बनियानला लावलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला व झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून, डिजीटल व्हॉईसरेकॉर्डर मधील ध्वनिमुद्रीत संभाषण पंचासमक्ष



Scanned with CamScanner

ऐकले. व त्यामध्ये सोनार श्री लक्ष्मण शेठ राजपुरोहित हे लोकसेवक श्री विठ्ठल गोसावी यांचेकरीता लाच मागत असलेबाबत स्पष्ट झालेल्या पडताळणीमध्ये निष्पन्न झाले.

पो.नि. शिंदे यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी पोनि शिंदे यांना रोख रू २,००,०००/— व रू. ४,००,०००/— रक्कमेचा चेकची व्यवस्था करून दि. २४/०२/२०२२ रोजी लाप्रवि, वरळी कार्यालयात हजर राहत असल्याचे सांगितले, ते त्यांनी मान्य करून त्यानंतर पो.नि.शिंदे यांनी पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित केली.

पो.नि. शिंदे यांचे सुचनेवरून मी दि. २४/०२/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे सकाळी ०८.३० वा चे सुमारास सपोआ नितीन जाधव, पो.नि. शिंदे यांचे समक्ष सकाळी हजर झालो. पो.नि. शिंदे यांनी लोकसेवक श्री. विठठल गोसावी यांचेवतीने व त्यांचेसांगणेप्रमाणे सोनार लक्ष्मणशेठ राजपुरोहित यांना लाच म्हणुन देण्याकरीता वापरावयाच्या रक्कमेबाबत माझेकडे विचारणा केली असता मी माझेकडे बचतीमधील रू. २,००,०००/— रोख रक्कम असल्याचे सांगुन माझेकडील रक्कम रुपये २,००,०००/— (रूपये २०००/— दराच्या १०० भारतीय चलनाच्या नोटा) व भारतीय स्टेट बँक वाशिंद शाखा, ता. शहापूर या बॅकेचा चा धनादेश क्र. ७१४५९१ चा रू. ४,००,०००/ रक्कमेचा नाव नमुद न केलेला धनादेश पो.नि. शिंदे यांचेकडे दिला. पो.नि. शिंदे यांनी सापळा पथकातील अंमलदारामार्फतीने सदर नोटांची व धनादेशची ब्युरो कार्यालयातील प्रिंटर झेरॉक्स मशीनवर प्रिंट काढली व सदर धनादेश व नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी माझी अंमलदाराकरवी झडती घेतली व मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवून लोकसेवक श्री. गोसावी यांचेवतीने सोनार श्री लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला डावा हात डोक्यावरून वारंवार फिरविणे असा पुर्वनियोजीत इशारा करावा, त्यावेळी सापळा पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवकास रंगेहाथ पकडतील असे सांगितले.

त्यानंतर आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी, मुंबई कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये शासकिय वाहनाचे वाहन चालक श्री. शिवतरे यांनी मला व पंचांना अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन पंचासमक्ष लाचेच्या रक्कम रू. २,००,०००/— (भारतीय चलनातील रू. २०००/— दराच्या १०० नोटा) व भारतीय स्टेट बँक वाशिंद शाखा, ता. शहापूर या बॅकेचा चा धनादेश क्र. ७१४५९१ चा रू. ४,००,०००/— किमंतीचा नाव नसलेला माझी स्वाक्षरी असलेला धनादेश यास अॅन्थ्रासीन पावडर लावली. सदरची रक्कम व धनादेश अलगद माझे हातामधील चॉकलेटी रंगाच्या हॅंडबॅगमध्ये ठेवली.

पो.नि. शिंदे यांनी सापळा पुर्व कारवाई पुर्ण करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातुन दोन शासकिय वाहनातुन सापळा पथकासह निघुन भिवंडी एस.टी. डेपो येथे जावुन पोहचलो. तेव्हा तेथे माझे मित्र बापु पाटील हे आधीपासुनच हजर होते. पो.नि. शिंदे यांचे सुचनेप्रमाणे पोनि शिंदे व सपोआ जाधव यांचे नेतृत्वाखाली दोन पथके तयार केली. त्यातील पोनि शिंदे यांचे पोलीस पथक, मी, माझे मित्र नामे श्री. बापु यशवंत पाटील व पंच न. ०१ नारायण रायपुरे असे सोनार श्री लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांच्या दुकानात जातील व सपोआ जाधव यांचे पथक व पंच क्र. ०२ तुकाराम चव्हाण हे लोकसेवक श्री गोसावी यांच्या कार्यालयाच्या बाहेर थांबतील असे ठरले.

त्यानंतर पोनि शिंदे यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे शर्टचे आतील बाजूस लावून पंच श्री. रायपुरे यांचेसह सापळा कारवाईकरीता सोनार श्री लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांच्या गुरूदेव शॉपिंग सेंटर तळमजला, पार नाका, भिवंडी येथील कार्यालयात पाठविले. त्या ठिकाणी सोनार श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित हे कार्यालयात उपस्थित होते. कार्यालयात जावून मी श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांच्याशी कामासंदर्भात बोलणी करीत

२४/०२/२०२२ P. B.

Scanned with CamScanner

असतानाच सोनार श्री. लक्ष्मण शेठ यांनी माझेकडे पैसे आणले का म्हणुन अशी लाचेच्या रक्कमेची मागणी केली असता, मी माझ्या चॉकलेटी रंगाच्या हॅंडबॅगमध्ये ठेवलेली ॲन्थ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. २,००,०००/– (भारतीय चलनातील रू. २०००/– दराच्या १०० नोटा) व भारतीय स्टेट बॅंक वासिंद शाखा, ता. शहापूर या बॅंकेचा चा धनादेश क्र. ७४५९१ चा रू. ४,००,०००/– किमंतीचा नाव नमुद न केलेला व माझी स्वाक्षरी असलेला धनादेश उजव्या हाताने माझे चॉकलेटी हॅंडबॅगमधुन काढुन श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांचेकडे दिले. श्री. लक्ष्मण शेठ हे मी दिलेली लाचेची रक्कम मोजत असतानाच मी त्यांचे कार्यालयाबाहेर येवून सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझा डावा हात डोक्यावरून वारंवार फिरवून ठरल्याप्रमाणे पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळेस सापळा पथकातील अंमलदारांनी तातडीने जावून सोनार श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांना लाचेची रक्कम रोख रू. २,००,०००/– व धनादेशासह ताब्यात घेतले. त्यानंतर पोनि शिंदे यांनी माझे शर्टच्या आत लावलेला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर पोनि शिंदे यांनी स्वतःची ओळख करून दिली व श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांना तुम्ही ही लाचेची रक्कम ज्यांच्या साठी स्वीकारली त्यांना फोन लावा असे सांगितले. त्यावरून श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांनी त्यांचे मो.क्र ९३२६००६१२३ यावरून नायब तहसिलदार श्री. विठ्ठल गोसावी यांचे मो.क्र.८७८८४१९७९४ यावर फोन करून रू. २,००,०००/– व रू. ४,००,०००/– किमतीचा चेक दिला असल्याचे मोबाईलवरील स्पीकर ऑन करून सांगितले. यावर नायब तहसिलदार श्री. विठ्ठल गोसावी यांनी " **आप ही देखोना...बाकी चेक लेलो...** " असे बोलून लाच रक्कम घेणेबाबत दुजोरा देवुन त्यांची सहमती दर्शवली. सदर संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आलेले आहे.त्यानंतर पोनि शिंदे व पथकाने श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांच्या ऑफिस ची लागलीच झडती पंचासमक्ष घेवुन एकुण ३२ वेगवेगळया बॅंक चेक त्यातील काही नाव नमुद असलेले व काही नाव नमुद नसलेले आणि त्यावर एकुण रक्कम १,७२,८२,५००/–रू नमुद केलेले असे चेक ताब्यात घेतले.

श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांना ताब्यात घेताच पोनि शिंदे यांनी त्यांचे मोबाईलवरून दुसऱ्या पथकातील सपोआ नितीन जाधव यांना त्यांचे मोबाईलवर फोन करून त्यांनी श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ ताब्यात घेतल्याचे सांगून पुढील कारवाई करण्यास सांगितले. त्यानुसार सपोआ नितीन जाधव यांनीदेखील त्यांचे पथकासह नायब तहसिलदार नामे श्री. विठ्ठल रामभाऊ गोसावी व खाजगी इसम श्री. विजय घोईर उर्फ पिंटया यास उप विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी यांना त्यांचे कार्यालयातुन त्यांचेसोबत असलेले प्रच क्र ०२ तुकाराम चव्हाण यांचेसमक्ष अटकावुन ठेवले.

सदर कारवाई पुर्ण झाल्याची माहिती प्राप्त होताच आम्ही, श्री. लक्ष्मण शेठ राजपुरोहित व पथक सरकारी वाहनातून उप विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी यांचे कार्यालयास आले. त्यानंतर मी सपोआ जाधव यांनी अटकावुन ठेवलेले नायब तहसीलदार श्री विठ्ठल गोसावी यांचे कार्यालयाची झडती घेतली असता त्या ठिकाणी ५ वेगवेगळया बॅंकचे नाव नमुद नसलेले चेक एकुण रक्कम ३७,६५,०००/– रू असे चेक मध्ये लिहलेले व रोख रक्कम २०,२००/– रू असे पंचासमक्ष जप्त केले. तसेच एंजंट विजय घोईर उर्फ पिंटया याच्या मारूती अरटिगा मध्ये रोख रक्कम ३,५३,०००/– आणि त्याच्या जवळील ६ वेगवेगळ्या बॅंकचे नाव नमुद नसलेले चेक त्यातील ३ चेकवर एकुण रक्कम २४,२५,६००/– रू मध्ये लिहलेले असे पंचासमक्ष जप्त केले.

सदरच्या कारवाईमध्ये वेगवेगळया बॅंकेचे चेक एकुण रक्कम २,३४,७३,१००/– व रोख रक्कम चेक ३,७३,२००/– हे लाचेच्या रक्कमेव्यतिरिक्त जप्त करण्यात आले.



Scanned with CamScanner

तरी माझेकडे लोकसेवक श्री विठ्ठल गोसावी, नायब तहसीलदार, उप विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भिवंडी विभाग, भिवंडी यांनी माझी भुसंपादन केलेल्या शेतीचा ५५,००,०००/— रू मोबदला मला देण्यासाठी एंजट विजय भोईर यांचेमार्फतीने ८ लाख रक्कमेच्या लाचेची मागणी करून तडजोडअंती लोकसेवक श्री विठ्ठल गोसावी, नायब तहसीलदार, उप विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भिवंडी विभाग, भिवंडी यांनी सहा लाख रू लाचेची मागणी केली व खाजगी इसम श्री लक्ष्मण शेठ राजपुरोहित, सोनार यांनी दोन लाख रू रोख व चार लाख रू बँक चेक अशा स्वरूपात लाच ही लोकसेवक विठ्ठल गोसावी यांचे सांगणेवरून स्वीकारली व त्यानंतर त्यास लोकसेवक श्री विठ्ठल गोसावी, नायब तहसीलदार यांनी सहमती दर्शवली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द तक्रार आहे.

माझी लोकसेवक श्री. विठठल गोसावी (नायब तहसिलदार, ता. भिवंडी सोनार श्री. लक्ष्मण शेठ व खाजगी इसम श्री. विजय भोईर उर्फ पिंटया यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असून, ती मला समजावून सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

[signature] 07/12/2022

(अमोल शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

P. B. Jadhav



Scanned with CamScanner